मा. मंत्री (महसूल) यांचे कार्यालय, शिबिर कार्यालय, नागपूर,
दिनांक 15 डिसेंबर 2015. - प्रसिध्दीपत्रक

# मुस्लिमांना पाच टक्के आरक्षण – उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय आल्यानंतरच पुढील कार्यवाही - मंत्री एकनाथराव खडसे

नागपूर, दिनांक 15 डिसेंबर : मुस्लिम समाजाला पाच टक्के आरक्षण देण्यासंदर्भातील एक प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. या प्रकरणी उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय झाल्यानंतरच पुढील आवश्यक ती कार्यवाही करणे योग्य होईल, असे कृषि, महसूल व अल्पसंख्याक मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज विधान परिषदेत सांगितले.

नियम 101 अन्वये मांडलेल्या लक्षवेधी सूचनेस उत्तर देताना खडसे पुढे म्हणाले की, 9 जुलै 2014 रोजीच्या अध्यादेशाद्वारे मुस्लीम समाजासाठी पाच टक्के आरक्षण देण्यात आले होते. या बाबत मा. उच्च न्यायालयाने 14 नोव्हेंबर 2014 रोजी अंतरिम निर्णय दिला असून उपरोक्त अध्यादेश अस्तित्वात असेपर्यन्त सदर कालावधीतील शासकीय व अनुदानित, शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आले आहे. सदर अध्यादेशाचे 23 डिसेंबर 2014 पर्यन्त कायद्यात रुपांतर न झाल्यामुळे तो व्यपगत (लॅप्स) झाला आहे. या प्रकरणी महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे. सन 2014-15 या शैक्षणिक वर्षात विशेष मागास प्रवर्ग (अ) यामध्ये खालील पकमाणे एकूण 665 विद्यार्थी प्रवेश झाले आहेत. अभियांत्रिकी - 370 , औषधनिर्माण शास्त्रे - 3, अभियांत्रिकी पदवी - 164, औषध निर्माण शास्त्र पदवी - 47, पदविका -4, तंत्र निकेतने - 36 , एम.बी.ए. - 36, आणि एम.ई - 5 .

या 665 जणांना दिलेला प्रवेश संरक्षित करण्यात आला आहे, असे खडसे यांनी यावेळी सांगितले.

***********